स्वामी विवेकानंद अकॅडमी, सेंट झेव्हियर्स उपांत्य फेरीत

व्हेरॉक करंडक : आकाश विश्वकर्मा, देवश्री भावसार सामनावीर किताबाचे मानकरी

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : औरंगाबाद जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मैदानावर सुरु असलेल्या आंतरशालेय व्हेरॉक करंडक क्रिकेट स्पर्धेत स्वामी विवेकानंद अकॅडमीने सेंट जोन्स संघाचा आणि सेंट झेव्हियर्स संघाने महाराष्ट्र पब्लिक स्कूलचा पराभव करीत उपांत्य फेरी गाठली. आज झालेल्या सामन्यांत आकाश विश्वकर्मा व देवश्री भावसार सामनावीर ठरले.

सकाळच्या सत्रात सेंट झेव्हियर्स स्कूलने प्रथम फलंदाजी करताना १५ षटकांत ७ बाद ११० धवा केल्या. त्यांच्याकडून आकाश विश्वकर्माने २४ चेंडूंत ४ चौकार व एका षटकारासह ४४ आणि कौस्तुभ गायकवाडने २१ धावांचे योगदान दिले. महाराष्ट्र पब्लिक स्कूलकडून तनुज सोळुंके याने २० धावांत ३ गडी बाद केले. आदित्य पाटीलने २, विशाल कोटकर व कौशल कांबळे यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.

प्रत्युत्तरात महाराष्ट्र पब्लिक स्कूलचा संघ १३ षटकांत ७५ धावांत सर्वबाद झाला. त्यांच्याकडून प्रथमेश देवने १८ व कौशल कांबळेने १५ धावा केल्या. सेंट झेव्हियर्सकडून विशाल बुरकुल व अथर्व जाधव यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले. कौस्तुभ गायकवाड व रौनक झा यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. दुसऱ्या सामन्यात स्वामी विवेकानंद अकॅडमीने प्रथम फलंदाजी करताना १५ षटकांत ८ बाद १०८ धावा केल्या. त्यांच्याकडून आनंद साळवेने ३७ चेंडूंत ३ चौकारांसह ४२ धावा केल्या. यश गाजरेने नाबाद २८ आणि ओंमकार शिंदेने १८ धावा केल्या. सेंट जोन्सकडून आकाश चौहानने २७ धावांत ३ व अजय पांचालने १८ धावांत २ गडीबाद केले. प्रत्युत्तरात सेंट जोन्सचा संघ १३.३ षटकांत ५७ धावांत गारद झाला.

स्वामी विवेकानंद अकॅडमीकडून देवश्री भावसारने ५ धावांत ५ गडी बाद केले. यश गाजरेने २ व रोहित बनसोडेने १ गडी बाद केला.

लोकमत समूहाचा उपक्रम : साडेसात हजार धावपटूंचा असणार सहभाग

आज औरंगाबाद महामॅरेथॉनचा थरार

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : लोकमत समूहातर्फे आयोजित महामॅरेथॉनच्या थरारास गारखेडा परिसरातील विभागीय क्रीडा संकुल येथून उद्या, रविवारी भल्या पहाटे प्रारंभ होणार आहे.

या महामॅरेथॉनमध्ये महाराष्ट्रच नव्हे, तर पूर्ण देशभरातून आणि परदेशातील असे साडेसात हजार धावपटू उद्या धावणार आहेत. यंदा संरक्षक दले, पोलीस, होमगार्ड आणि विशेष दलातील धावपटूंना विशेष बक्षीस दिले जाणार आहे. गतवर्षी या महामॅरेथॉनमध्ये ५ हजारांपेक्षा जास्त जणांनी सहभाग नोंदवला होता. यंदा मात्र साडेसात हजारांपेक्षा विक्रमी सहभाग असणार आहे.

महामॅरेथॉनला सकाळी ६ वाजता २१ कि. मी. अंतराच्या अर्धमॅरेथॉनने सुरुवात होणार आहे. १० कि. मी. अंतराची मॅरेथॉन सकाळी ६.१५ आणि ५ व ३ कि. मी. अंतराच्या मॅरेथॉनला सकाळी ७ व ७.१० वाजता सुरुवात होणार आहे.

उद्घाटन सोहळ्यास मराठमोळी अभिनेत्री संस्कृती बालगुडे आणि अभिनेता देवदत्त नागे यांची उपस्थिती हे आकर्षण ठरणार आहे. उद्घाटन सोहळ्यास महापौर नंदकुमार घोडेले, पोलीस महानिरीक्षक मिलिंद भारंबे, पोलीस अधीक्षक डॉ.आरती सिंह, पोलीस उपआयुक्त राहुल श्रीरामे, पोलीस उपआयुक्त दीपाली घाडगे, पुरातत्व विभागाचे उपअधीक्षक डॉ. शिवकांत बाजपेयी हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. बक्षिसांचे वितरण विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे, महापौर नंदकुमार घोडेले, खा. चंद्रकांत खैरे, आ. संजय शिरसाठ, आ. सतीश चव्हाण, आ. अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी ९.३० वाजता होणार आहे.

हायकोर्ट, स्कोडाची प्रतिस्पर्धी संघांवर मात

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : गरवारे क्रीडा संकुलावर सुरु असलेल्या ६ व्या राम कमला औद्योगिक टी-२० क्रिकेट स्पर्धेत हायकोर्ट संघाने एमआयटी रुग्णालयाचा तर स्कोडाने लिप फास्टनर संघाचा पराभव केला.

पहिल्या सामन्यात हायकोर्ट संघाने ६ बाद १३७ धावा केल्या. त्यांच्याकडून ज्ञानेवर पटीलने ४७ व कुणाल काळे याने ३२ धावा केल्या. एमआयटीकडून साईनाथ डहाळे व सारंग कांबळे यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. प्रत्युत्तरात एमआयटी रुग्णालय ८६ धावांत गारद झाला. त्यांच्याकडून केदार काळेने १६ धावा केल्या. हायकोर्ट संघाकडून मनोज शिंदेने ५ गडी बाद केले. आबा शिंदे व पवन इप्पार यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले.

दुसऱ्या सामन्यात लिप फास्टनरने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद १२८ धावा केल्या. त्यांच्याकडून राजू मदन याने ६३, राहुल पाटीलने २५ धावा केल्या. स्कोडाकडून मंगेश गरड व संदीप खोसरे यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. प्रत्युत्तरात स्कोडा संघाने विजयी लक्ष्य ५ गडी गमावून गाठले. त्यांच्याकडून विजय हंडोरे याने ३५, अभिजित भगतने २९ व संदीप खोसरेने २२ धावांचे योगदान दिले. लिप फास्टनरकडून राजू मदन याने २, तर प्रणव राजळे याने १ गडी बाद केला.

गोवा येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय फुटसाल स्पर्धेत उपविजेतेपद पटकावणारा महाराष्ट्राचा मुलांचा संघ. सोबत प्रशिक्षक रणजित भारद्वाज व मोहंमद रियाज.

राष्ट्रीय फुटसाल स्पर्धेत महाराष्ट्राला उपविजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : गोवा येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय वरिष्ठ फुटसाल स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलांच्या संघाने उपविजेतेपद पटकावले. गोवा संघाने महाराष्ट्राला अंतिम फेरीत ३-२ गोलने पराभूत केले. या स्पर्धेत महाराष्ट्राकडून कर्णधार सिद्दीकी आकिब, आकाश चौधरी, विशाल मगरे यांनी लक्षवेधी कामगिरी केली. विशाल मगरे याने तेलंगणा व गुजरात संघाविरुद्ध गोलची हॅट्ट्रिक नोंदवली. गोलरक्षक आकाश चौधरी याने सर्वोत्तम गोलकिपरचा पुरस्कार जिंकला. मुलींमध्ये ऋतुजा गुणवंत, प्रियंका मुरादे, जया कुमार यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. उपविजेतेपद पटकावणारा महाराष्ट्राचा संघ : प्रतीक स्वामी (औरंगाबाद), आकाश चौधरी (रायगड), विशाल मगरे (औरंगाबाद), सिद्दीकी आकिब (कर्णधार, औरंगाबाद), समरीन रॉय (पुणे), नॅथून स्टीवन्स (पुणे), लियॉन नेसमानी (पुणे), हर्षद चव्हाण (रत्नागिरी), मनीष पंजाबी (रायगड), दमनप्रीत सिंग (रायगड), मोहन नेवारे (भंडारा), सियॉन डिसुझा. संघाला प्रशिक्षक रणजित भारद्वाज आणि व्यवस्थापक मोहंमद रियाज यांचे मार्गदर्शन लाभले.

माझे कुटुंब आहे पूर्णपणे सुरक्षित प्रत्येक मोसमात, प्रत्येक आजारांपासून

पाच प्रकारच्या तुळशींपासून अत्यंत खास विधीद्वारे तयार अर्क जॉली तुलसी ५१ ड्रॉप्सचे नियमित सेवन करा. ते तुमच्या शरीराची रोगप्रतिकारक क्षमता मजबूत करण्यामध्ये मदत करते. डासांपासून होणारे मोसमी ताप, फ्लू, ॲलर्जी, सर्दी, खोकला, श्वसन रोग, अनिद्रा, तणाव, डोकेदुखी, केस गळणे, सांधेदुखी, त्वचा रोग, बद्धकोष्ठता, ॲसिडिटी आदी रोगांपासून बचाव करण्यामध्ये मदत करते आणि तुमचे जीवन निरोगी ठेवते.

JOLLY

पाच प्रकारच्या तुळशींपासून अत्यंत खास विधीद्वारे तयार अर्क

तुलसी 51 ड्रॉप्स

एक नैसर्गिक आणि शक्तिशाली इम्युनिटी बूस्टर

डॉ. करनवीर जैन

मी जॉली तुलसी ५१ चा वापर मागील २ वर्षांपासून करीत आहे. त्याचा मला खूप जास्त फायदा झाला आहे. ही सांधेदुखी, कमी झोप, गॅस, डिप्रेशनकरिता अत्यंत लाभदायक औषधी आहे. मी जॉली तुलसी-५१ चा उपयोग सर्व लोकांना (विशेषकरून ज्येष्ठ नागरिकांना) करण्याचा सल्ला देत असतो आणि श्री वैद्य सतपाल मधोकजी यांना या लाभदायक औषधीकरिता धन्यवाद देतो, जी समाजाकरिता अत्यंत लाभदायक आहे. माझ्या वतीने आपल्या संघटनेच्या निरंतर विकासाकरिता शुभेच्छा. आपला आभारी (करनवीर) गुडगाव, हरियाणा.

प्रत्येक मेडिकल स्टोअरमध्ये उपलब्ध आहे.| Helpline» 90416-66693

प्रत्यक्ष गेमींग २४ तास खुला

सोमवार ते गुरुवार प्रत्येक व्यक्तीला रु. १५००/- आपल्याला रु. ५००चे ओटीपी मिळतील*

शुक्रवार ते रविवार प्रत्येक व्यक्तीला रु. २०००/- आपल्याला रु.१०००चे ओटीपी मिळतील *

बुफेवर अमर्यादित जेवण

अमर्यादित उत्तर भारतीय चाट (सायं ७.३० ते ११ वा.)

अमर्यादित ड्रींक्स आणि स्नॅक्स गेमींग टेबलवर खेळणाऱ्यांना

मनोरंजनाचा कार्यक्रम ९.३० वा. बॉलीवूड डान्स आणि डीजे

*वन टाईम प्ले कुपन

ग्राहक सेवा २४ X ७ ०८३२ ६५१६६६६

www.casinopridegroup.com casinopridegoa

ZANDU EXPERT IN LIFESTYLE DISORDERS

तुमच्या मधात (हनीमध्ये) साखर आहे काय?

नामांकित आंतरराष्ट्रीय प्रयोगशाळेद्वारे केलेल्या चाचणीमध्ये प्रमुख हनी ब्रँड्समध्ये 'ऍडेड शुगर' अढळून आली आहे, परंतु झंडु प्युअर हनीमध्ये 'ऍडेड शुगर' अढळलेली नाही.

जगप्रसिध्द लॅब इंटर्टेक द्वारे केलेल्या 'शुगर एडिशन' चाचण्यांचा सारांश			
ब्रँड	साखरेचे प्रकार		
	राईस सिरप	स्टार्च-बेस्ड शुगर सिरप (ओलिगोसॅक्राईड्स)	सारांश
प्रमुख ब्रँड 1	✓	✓	ऍडेड शुगर अढळून आली
प्रमुख ब्रँड 2	✓	✓	ऍडेड शुगर अढळून आली
झंडु प्युअर हनी	×	×	ऍडेड शुगर अढळलेली नाही

New Pack

Zandu Guarantee No Added Sugar

झंडूचा 100 वर्षांचा अनुभव घेवून आला आहे, 'नो ऍडेड शुगर' – झंडु प्युअर हनी.

आमच्यासाठी शुध्दता खुप महत्वाची आहे, म्हणूनच आम्ही आमच्या प्रत्येक बॅचला शुध्दता चाचणीसाठी जर्मन प्रयोगशाळेत पाठवितो. जेणेकरुन आपल्यापर्यंत 'नो ऍडेड शुगर' गॅरंटीने प्रमाणित 100% प्युअर हनी पोहोचेल. आपला विश्वास आमच्यासाठी मोलाचा आहे, यासाठी आपण www.zandupurehoney.com वर लॉग ऑनकरुन या दाव्याची मान्यता स्वत: तपासून पाहू शकता.

प्रत्येक बॅच जर्मन लॅबमध्ये तपासलेली झंडुच्या शुध्दतेचा विश्वास.

ZANDU 100 YEARS

वरील परिणाम इंटर्टेक जर्मनीमध्ये केलेल्या विविध प्रकारच्या 'शुगर एडिशन' चाचण्यांचा सारांश आहे. भारतातील प्रमुख हनी ब्रँड्सच्या सँपलची निवड इंडिपेंडेंट एजन्सी IMRB द्वारे निष्पक्षपणे केली गेली आणि इंटर्टेक जर्मनी येथे पाठविण्यात आली. तपासणी करण्यात आलेल्या सर्व निवडक सँपल्सचे उत्पादन जून-जूलै'17 मध्ये झाले होते. चाचणी परिणामांचे संक्षिप्त वर्णन www.zandupurehoney.com वर उपलब्ध आहे.